2014

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ )

ISSN : 2277-8721)

Impact factor:0.987

VOL - III

ISSUES - III

Bi-Monthly

Chief-Editor: Ubale Amol Baban

**Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)**
**Bi-monthly**
**Vol III Issues III**
**Reviewed Journal**

**ISSN 2277-8721**

May-June 2014

# मराठवाड्यातील ग्रामीण भागातील महिला लोकप्रतिनिधीना येणाऱ्या समस्येचा : चिकित्सक अभ्यास

*EDUCATION*

**प्रा.अंगद केशवराव सुरवसे**
श्री शंकरराव काळे अध्यापक विद्यालय, लातूर

**"यत्र नार्यस्तु जुन्यते, रमन्ते तंत्र देवता :"**

वरील पद्यांशाचा अर्थ असा होतो की, ज्या ठिकाणी स्त्रीयाचा मान-सन्मान केला जातो, तिथे देवता वास करतात. प्राचीन भारतीय संस्कृतीचा आपण बघीतल्यास गार्गी, मैत्रेयी त्याचप्रमाणे नंतरच्या काळात जिजामाता, राणीलक्ष्मीबाई, चाँदबीबी, ताराबाई, आधुनिक काळापुर्व डॉ.आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई, इंदिरा गांधी, मदर तेरेसा अशा कितीतरी विदुषनी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केल्याची माहिती आहे.

आपल संस्कृती ही प्राचीन काळापासून सनातन आणि कर्मठ मानली जाते आणि यामुळे समाजामध्ये स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळाल्याचे दिसून येत आहे. भारतीय समाजाने नेहमी पुरूष संस्कृतीचा पुरस्कार केला आहे. त्यामुळेच वरील एकंदरीत आढावा घेतल्यास असे निदर्शनास येईल की, संधी मिळाल्यावर स्त्रीया देखील मोठे-मोठे कार्य करण्याची क्षमता या वर्गामध्ये आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पुरोगामी राज्य म्हणून आपल्या महाराष्ट्राची ओळख आहे आणि या राज्यामध्ये जे काही समाजसुधारक त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ.शाहू महाराज, महात्मा फुले, म. कर्वे यांनी देखील स्त्रीयांचे नारी शक्तीचा गौरव केल्याचे दिसते.

**Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)**
**Bi-monthly**
**Vol III Issues III**
**Reviewed Journal**
**ISSN 2277-8721**
May-June 2014

महाराष्ट्र सरकारने महिलांना राजकारण किंवा इतर क्षेत्रामध्ये 50% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. यचे कारण एवढेच आहे की स्त्रीयांना पुरूषाएवढाच मान आणि स्त्री-पुरूष समानता यासाठीच शासनाने

योग्य निर्णय घेतल्याचे दिसून येते. यामुळेच ग्रामीण भागातील महिला ह्या ग्रामसदस्य, सरपंच, जि.प.सदस्या आदि महत्त्वाच्या ठिकाणी महिला ह्या जिकारीने काम करत आहेत.

परंतु एवढे होऊनही काही ठिकाणी सनातन तथा पुरूष संस्कृतीचा विचार करणाऱ्यांनी महिलांची अडवणूक केल्याचे प्रकर्षाने जाणवते. स्त्रीया-पुरूष समानता असताना कायदे असताना स्त्रीयाचे हक्क पायदळी तुडवले जातात.

उदा :- 1) ग्रामीण भागातील लोकप्रतिनीधी त्यामध्ये महिला सरपंच किंवा मोठ्या पदावरील महिलेस राष्ट्रीय सणासाठी  ध्वजारोहण करू न देणे किंवा शहरी कार्पोरेट क्षेत्रातील महिलांना लैंगिक छळवणूक आदि बाबी या घडून आल्याचे दिसून यते. करिता संशोधकाने मराठवाड्यातील ग्रामीण भागामधील लोकप्रतिनीधिंना येणाऱ्या समस्या याचा अभ्यास सदर शोधनिबंधातून केला आहे.

**संशोधन विधान :**

**मराठवाड्यातील ग्रामीण भागातील महिला लोकप्रतिनीधीना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास.**

**संशोधनाची उद्दिष्टये :**

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील महिला लोकप्रतिनीधींना येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :**

**Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)**
**Bi-monthly**
**Vol III Issues III**
**Reviewed Journal**
ISSN 2277-8721
May-June 2014

प्रस्तुत संशोधनाकरिता आठ जिल्ह्यामधील प्रत्येक जिल्ह्यात एक तालुकाची निवड करून त्यामधील 10 गावातील ग्रामसदस्य तथा सरपंच किंवा जि.प. सदस्य किंवा पं.स. सदस्य याची निवड करून मुलाखतीच्या द्वारे येणाऱ्या अडचणींचा तथा समस्येचा मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ग्रामीण महिलांना येणाऱ्या समस्या :**

1. **पुरूष प्रधान संस्कृती :**
   ग्रामीण भागामध्ये पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे महिलाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कमी दर्जाचा आहे. यांना कुठलेच निर्णय घेण्याचा अधिकार नाही. या जरी लोकप्रतिनीधी म्हणून निवडून आल्या तरी सर्व निर्णय हे घरातील पुरूष मंडळी घेतात त्यामध्ये काही ठिकाणी पती, दिर, सासरे किंवा वडील, भाऊ अशा स्वरूपामध्ये पुरूष प्रधान मंडळी कार्यरत आहेत.
2. **निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांची उपेक्षा :**
   महिला ह्या लोकप्रतिनिधी असल्या तरी समाजासाठी काही निर्णय घेण्याची वेळ असते. त्यामध्ये शासकीय धोरणे असतील त्यामध्ये यांना कुठलेच स्थान दिसून येत नाही. काही जणाची इच्छा असूनही निर्णय प्रक्रियेमध्ये डावलण्याचे काम झाल्याचे दिसून येते.
3. **स्त्री सहभागाबद्दल उदासिनता :**
   ग्रामीण भागातील महिला प्रतिनिधी या घराच्या बाहेर देखील पडायला तयार होत नाहीत. चुल आणि मुल यामध्येच गुरूफुटल्याचे दिसते. कुठल्याही धोरणाबाबत या महिला प्रतिनिधीचे उदासिनताचे स्वरूप या ठिकाणी दिसते.
4. **शैक्षणिक अर्हता बाबत :**
   ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधीनी शिक्षणाकडे बघितल्यास जास्तीत जास्त प्रतिनीधी ह्या केवळ प्राथमिक शिक्षण उदा 1 ते 7 वी पर्यंत शिक्षण घेतल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे धोरणे ठरवताना एक प्रकारचे दुय्यम प्रतीची लाचारी येते. शिक्षण हा मानवाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. मानव विकासामध्ये स्त्री आणि पुरूष समान विकास अभिप्रेत असतो. परंतु महिलांच्या कमी शिक्षणाबद्दल या विकासामध्ये अडथळा ठरल्याचे दिसते.
5. **कुटूंबामध्ये वंशाचा दिवा :**

महिला लोकप्रतिनिधीमध्ये आपला उत्तराधिकारी म्हणून कोणाची निवड कराल अशा स्वरूपाची प्रश्नांची मांडणी जेंव्हा केली तेंव्हा 99% महिलांनी आपल्या मुलालाच प्राधान्य दिल्याचे दिसते. यामध्ये आपल्या मुलीला फक्त 1% महिलांनी पंसती दिली यावरून असे स्पष्ट होते की, वंशाचा दिवा म्हणून मुलगाच पुढे पाहिजे असे दिसून येते.

6. **शासनाचे उदासिन धोरण :**

   शासनाने महिलांना 50% आरक्षण देवून आपली जिम्मेदारी निभावली परंतु बाकीच्या बाबतीत धोरणामध्ये उदासिनता दिसून येते. कुठल्याही धोरणामध्ये महिलांना दुय्यम प्रतीचे स्थान मिळाल्याचे दिसून येते आणि महिलावर होणाऱ्या अडचणी - समस्या याबद्दल शासकीय यंत्रणा गेंड्याच्या कातडी सारखी असल्याची दिसते.

**निष्कर्ष :**

1. मराठवाड्यातील ग्रामीण महिला लोक प्रतिनिधीबाबत येणाऱ्या समस्येमध्ये समान शासन पुरूषप्रधान संस्कृती जबाबदार असल्याचे दिसते.
2. महिलामध्ये शिक्षण तथा स्वावलंबनाचा अभाव असल्याचे दिसून येते. राष्ट्रनिर्माणासाठी जे सुदृढ व्यक्तीमत्व आवश्यक असते परंतु या अपेक्षा यांच्याकडून दिसून येत नाहीत पर्यायाने हा समाजाचा किंवा राष्ट्रीय नुकसान आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.
3. आत्मसन्मानाची उणीव तथा पुरूषसंस्कृतीचा निर्णय प्रक्रियेत अतिरेकी हस्तक्षेप यामुळे आत्मसन्मानाची भावना जागृत होत नाही.
4. स्त्री-पुरूष समानतेमध्ये केवळ महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळणे त्यामुळे मानवविकास मध्ये अडथळा येण्याची शक्यताही दिसत आहे.
5. महिलांसाठी भरपूर कायदे आहेत परंतु त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही त्यामुळे कुठेतरी या कमी पडतात असे वाटते. त्यामुळे कायद्याची कठोर अंमलबजावणी होणे ही अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

1. लोकराज्य - महिला दिन विशेष - मार्च 2010, ऑगस्ट 2012.

2. डॉ. हिंगोले - माने रेखा - महिला सक्षमीकरण समस्या व उपाय, इशा प्रकाशन लातूर. प्रथम आवृत्ती 2006.
3. जोगळेकर मृणालीनी - स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई - प्रथम आवृत्ती 1991.
4. प्रा.कवी माधवी - महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर